प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, फोर्ट, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, S.B.S.Marg, Fort, Mumbai-400001
फोन/Phone: 022- 22660502

नोव्हेंबर 01, 2021

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित कलम 35 अ खालील निदेश - दि कपोल सहकारी बँक लि., मुंबई, महाराष्ट्र - मुदतवाढ**

भारतीय रिझर्व्ह बँकेने, निदेश डीसीबीएस.सीओ.बीएसडी-आय./डी-9/12.22.111/2016-17 दि. मार्च 30, 2017 अन्वये, दि कपोल सहकारी बँक लि., मुंबई, महाराष्ट्र ह्यांना, मार्च 30, 2017 रोजीचे व्यवहार समाप्त झाल्यापासून सहा महिन्यांसाठी निदेशांखाली ठेवले होते. वरील निदेशांची वैधता वेळोवेळी वाढविण्यात आली होती व ती शेवटून ऑक्टोबर 31, 2021 पर्यंत वाढविण्यात आली होती.

(2) जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित, कलम 35 अ च्या पोटकलम (1) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँक येथे निदेश देते की, निदेश डीओआर.एमओएन.डी-43/12.22.111/2021-22 दि. ऑक्टोबर 27, 2021 अन्वये वरील निदेश त्या बँकेला, पुनरावलोकनाच्या अटींवर, एप्रिल 30, 2022 पर्यंत लागु असतील.

(3) संदर्भित निदेशांमधील इतर सर्व अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही. वरील मुदतवाढ अधिसूचित करणा-या दि. ऑक्टोबर 27, 2021 रोजीच्या निदेशाची एक प्रत वरील बँकेच्या कार्यालयात, जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करण्यात आली आहे.

(4) भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मुदतवाढीचा आणि/किंवा बदलाचा अर्थ, वरील बँकेच्या वित्तीय स्थितीबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेचे समाधान झाले आहे असा घेण्यात येऊ नये.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशनी : 2021-2022/1125**